# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:19.03.2026** **वार: गुरुवार**

---

1. भव्य या नावाने ओळखली जाणाऱ्या 'भारत औद्योगिक विकास योजनेला केंद्राची मंजुरी
2. राष्ट्रपती चैत्र नवरात्रोत्सव शुभारंभानिमित्त अयोध्येच्या दौऱ्यावर, नववर्षानिमित्त देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन
3. पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्षांदरम्यान चर्चा आणि
4. उत्तरेकडील राज्यात पावसाचा अंदाज

**मंत्रिमंडळ निर्णय**

भव्य या नावाने ओळखली जाणाऱ्या 'भारत औद्योगिक विकास योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मंजूरी दिली. याअंतर्गत 33 हजार 660 कोटी रुपयांच्या तरतुदीसह 100 'प्लग-अँड-प्ले' औद्योगिक क्षेत्राचा विकास केला जाणार आहे. असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर नवी दिल्ली इथं प्रसारमाध्यमांना सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.जागतिक दर्जाची औद्योगिक पायाभूत सुविधा विकसित करणं, देशाची उत्पादन क्षेत्राचा पूर्ण क्षमतेने उपयोग करुन घेणं आणि देशाच्या विकासाला गती देणं, हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. 100 ते 1000 एकर क्षेत्रफळाची औद्योगिक पार्क विकसित केली जातील आणि यासाठी प्रति एकर एक कोटी रुपयांपर्यंतचे आर्थिक सहाय्य दिले जाईल. प्लग अँड प्ले या तत्त्वावर आधारित या उद्योगांद्वारे 15 लाख प्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांचं सक्षमीकरण आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला पुढे नेण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, मंत्रिमंडळाने 2023-24च्या कापूस हंगामासाठी भारतीय कापूस महामंडळाला किमान आधारभूत किंमत भरपाईसाठी 1 हजार 718 कोटी रुपयांहून अधिक निधी मंजूर केला आहे. या निधीचा उद्देश देशभरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना थेट हमीभाव देण्यास मदत होणार आहे. असंही वैष्णव यांनी नमूद केलं.

**कोकण रेल्वे**

कोकण रेल्वेच्या उर्वरित मार्गांचं दुहेरीकरण लवकरच सुरू होणार असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल लोकसभेत दिली. शिवसेनेचे खासदार रवींद्र वाईकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. कोकण रेल्वे मार्गावरील काम पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त वंदे भारत एक्सप्रेस सेवा सुरू करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. सर्व संबंधित राज्यांनी सहकार्य केल्यास कोकण रेल्वेचा विकास अधिक वेगानं होईल, असंही वैष्णव यांनी स्पष्ट केलं. ते म्हणाले...

**कंटीन्यूअसली लॉस में ये है आह केआरसीएल तो जब कंटीन्यूअसली लॉस में है, तो उसको कैसे उसका इन्वेस्टमेंट करे किस तरह से नेटवर्क का एक्सपेंशन करे हमने कर्नाटक से भी और केरल से भी बार बार रिक्वेस्ट किया है। कई लेटर्स लिखे गए हैं और जब भी मेरा किसी से संवाद होता है। केरल के मुख्यमंत्री जी से या कर्नाटक के मुख्यमंत्री जी से उनको भी मैंने पर्सनल रिक्वेस्ट किया है कि देश का हित आगे सोचिए आप अपना छोटा जो सेल्फ**

**इंटरेस्ट है, उससे ऊपर उठ के देश का हित सोचिए वो अगर काम हो जाता है तो कोंकण रेलवे के इस पूरे नेटवर्क का जैसे देश में माननीय प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी जी देश के पूरे रेलवे नेटवर्क को एक्सपैंड कर रहे हैं। कैपेसिटी बढ़ा रहे हैं वैसे कोंकण में भी आगे बढ़ सकता है काम कोंकण रेलवे के जो जितने क्रिटिकल चक पॉइंट्स है उनके डबलिंग के लिए आलरेडी डीपीआर बनाने का काम कंप्लीट करने पे आया है वो बहुत तेजी से उसमें प्रोग्रेस हुई है। बहुत ही कॉम्प्लेक्स प्रोजेक्ट है माननीय अध्यक्ष महोदय लेकिन उसको आगे बढ़ाने में हम लगातार प्रयासरत है।**

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून उत्तर प्रदेशच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. आज त्या अयोध्येला भेट देणार आहेत. 'श्री राम यंत्र स्थापना' कार्यक्रम तसंच मथुरा-वृंदावनमध्ये विविध कार्यक्रमांमध्ये त्या सहभागी होतील. आज अयोध्येत चैत्र नवरात्रीच्या पहिल्या दिवशी राम मंदिरात होणाऱ्या वैदिक विधींना उपस्थित राहतील.

**गुढीपाडवा**

आज चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा, नवीन वर्षाचं उत्साहात स्वागत करण्यासाठी आज देशभरांत विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज भारतीय नववर्ष आणि चैत्र सुकलादी, उगादी, गुढी पाडवा, चेटी चांद, नवरेह आणि साजीबू चेइराओबा या वसंतोत्सवानिमित्त साजऱ्या होणाऱ्या सणांनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हे उत्सव प्रेम आणि सलोख्याच्या माध्यमातून भारतातील विविध समुदायांमध्ये एकतेची भावना वृद्धिंगत करतात, तसेच नागरिकांच्या आयुष्यात सुख, समृद्धी आणि कल्याण घेऊन येतात. असं आपल्या संदेशात राष्ट्रपतींनी नमूद केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही नवसंवत्सरनिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. नवीन वर्षात साहस, आत्मविश्वास आणि सेवा या भावना सशक्त व्हावी. राष्ट्रनिर्माणाच्या प्रयत्नांना बळकटी मिळावी अशा शुभेच्छा त्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात दिल्या आहेत.

**गॅस-सिलेंडर**

पश्चिम आशियातील अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना स्वयंपाकाच्या व्यवसायिक सिलिंडरचा साठा 30 टक्क्यांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव दिला आहे. देशात कच्च्या तेलाची उपलब्धता सामान्य असून, तेलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेनं कार्यरत असल्याचं आश्वासन केंद्र सरकारनं दिलं आहे. नवी दिल्लीत आयोजित आंतर-मंत्रालयीन बैठकीदरम्यान, पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्रालयाच्या सहसचिव, सुजाता शर्मा यांनी सांगितलं की, देशांतर्गत एलपीजी उत्पादनात 40 टक्क्यांनी वाढ झाली असून, देशभरातील कोणत्याही किरकोळ विक्री केंद्रावर साठा संपल्याची किंवा तुटवड्याची कोणतीही तक्रार नोंदवली गेलेली नाही. दरम्यान, देशभरात साठेबाजांवर कारवाई करण्यात येत असून गेल्या काही दिवसांत सुमारे 12 हजार ठिकाणी धाड टाकण्यात आल्या असून, एकंदर 15 हजार सिलिंडर्स जप्त करण्यात आले आहेत. अशी माहितीही शर्मा यांनी दिली.

सर्व भारतीय जहाजं सुरक्षित असून, कोणत्याही अनुचित घटनेची अद्याप नोंद झालेली नाही. गेल्या 24 तासांत, विविध बंदरांवरून आपल्या कामाची वेळ संपल्यानंतर 25 भारतीय नागरिकांना मायदेशी परत आणण्यात आलं आले. अशी माहिती जलमार्ग मंत्रालयाचे विशेष सचिव राजेश कुमार सिन्हा यांनी काल दिली. गुजरातच्या बंदरांवर नुकतीच दाखल झालेली 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' या एलपीजी वाहक जहाजांवरील माल गरजेनुसार उतरवला जात आहे. 'जग लाडकी' नावाचं मोठं भारतीय जहाज संयुक्त अरब अमिरातीमधून 81 हजार मेट्रिक टन उच्च दर्जाचे तेल घेऊन गुजरातच्या मुंद्रा बंदरावर काल दाखल झाले. असंही ते म्हणाले.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायद अल नाहयान यांच्याशी पश्चिम आशियातील परिस्थितीवर चर्चा केली. अशी माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर

जयस्वाल यांनी काल दिली. दोन्ही नेत्यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मालवाहतूक जहाजांचा प्रवास सुरक्षित होण्यासंदर्भातील मुद्यांवर चर्चा केली. पश्चिम आशिया क्षेत्रात शांतता, सुरक्षा आणि स्थैर्य पुन्हा स्थापित करण्याच्या उद्देशाने एकत्र काम करण्यास सहमती दर्शवली. तेहरानमधील भारतीय दूतावासाने भारतीय नागरिकांसाठी, विशेषतः विद्यार्थ्यांसाठी, अर्मेनिया आणि अझरबैजानला रस्त्याच्या सीमेमार्गे प्रवास करण्यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे. अशी माहितीही त्यांनी दिली.

**<u>गबार्ड</u>**

चीन, रशिया आणि पाकिस्तान यांनी हाती घेतलेला लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांच्या विकासाचा कार्यक्रम हा अमेरिकेसाठी सर्वात गंभीर धोका ठरू शकतो. असं अमेरिकेच्या गुप्तचर प्रमुख तुलसी गॅबार्ड यांनी म्हटले आहे. सिनेटच्या गुप्तचर समितीसमोर गबार्ड यांनी काल निवेदन दिलं. अमेरिकेस भेडसावणारा हा धोका सामूहिकरीत्या विस्तारणार असून, सध्याच्या 3 हजार हून अधिक क्षेपणास्त्रांवरून ही संख्या 2035 पर्यंत 16 हजारपेक्षा अधिक क्षेपणास्त्रांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. असंही त्या म्हणाल्या.

**<u>गुटेगेज</u>**

काबुलमधील एका रुग्णालयावर पाकिस्तानने केलेल्या प्राणघातक हवाई हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, या घटनेची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी केली आहे. पाकिस्तानने केलेल्या हवाई हल्ल्यादरम्यान, अंमली पदार्थ व्यसनमुक्ती केंद्राच्या रुग्णालयावर झालेल्या पाकिस्तानी हल्ल्यात 400 हून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती अफगाणिस्तानच्या तालिबान सरकारने संयुक्त राष्ट्राला दिल्यानंतर गुटेरेज यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. दरम्यान, गुटेरेज यांनी ईदच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात तात्पुरत्या युद्धविरामाचं स्वागत केले आणि हा युद्धविराम पुढेही वाढवला जाईल, अशी आशा व्यक्त केली.

**<u>हवामान</u>**

जम्मू आणि काश्मीर तसेच लडाख या भागांसाठी, उद्यापर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. दिल्ली, पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, चंदीगड, छत्तीसगड, पूर्व मध्य प्रदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, ओडिशा आणि पश्चिम उत्तर प्रदेश या भागांसाठीही वीजांसह वादळं आणि गारपिटीचा अंदाज आहे. किनारपट्टीवरील कर्नाटक, कोकण, गोवा, तामिळनाडू, पुद्दुचेरी, कराईकल, झारखंड, केरळ, माहे, पश्चिम बंगाल, सिक्कीम आणि ईशान्येकडील राज्यांमध्येही अशीच हवामानाची स्थिती कायम राहील.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार